## *प्रबोधिनीत यायचे...*

प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया
समर्थ मायभूमीला जगी करावया ।। ध्रु. ।।
खेळ खूप खेळुनी सतेज व्हायचे
रोज नवे ज्ञानदिवे चेतवायचे
सुरेख लेखना, उदंड वाचना
स्फूर्ती घेऊ या, या यशाकडेच जाऊ या ।। १ ।।
फूल फूल गुंफुनीच माळ होतसे
थेंब थेंब झेलुनी झरा वहातसे
मोकळ्या मनी, प्रेम फुलवुनी
माळा गुंफू या, या साखळी जोडु या ।। २ ।।
हातचे न हात हे कधी सुटायचे
बिकट वाट ही तरी पुढेच जायचे
ना रुसायचे, सदा हसायचे
गीता गाऊ या, या प्रेरणा घेउ या ।। ३ ।।
मान मायभूमिची जगात उंचवू
जेथ जाऊ तेथ तेथ विजय मेळवू
जिद्द जागवू, मशाल पेटवू
ही हाक ऐकून या, या ज्योत घेऊन या ।। ४ ।।

# ज्ञान प्रबोधिनीची

# प्रार्थना

### व तिचा सोपा भावार्थ

**(केवळ अंतर्गत वितरणासाठी )**
**(मूल्य रुपये पाच फक्त)**

## प्रस्तावना

प्रसिद्ध मराठी साहित्यिक डॉ. वि. रा. तथा मोहनराव करंदीकर हे ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. वि. वि. तथा अप्पाजी पेंडसे यांचे निकटचे मित्र होते. त्यांनी 'स्नेहबंधन' या आपल्या कवितेची प्रत कै. अप्पांना पाठविली होती. आठ कडव्यांच्या या कवितेची सुरुवात 'राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची' या ओळीने होते. याच ओळीने सुरुवात होणारी पाच कडवी कै. अप्पांच्या विनंतीवरून डॉ. वि. रा. करंदीकर यांनी लिहिली. त्यात कै. आप्पांनी काही बदल केले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्लंडमध्ये त्यांना अटक झाल्यानंतर 'माझे मृत्युपत्र' या शीर्षकाची एक दीर्घ कविता आपल्या थोरल्या वहिनींना पाठविली होती. त्यातील शेवटचे कडवे 'की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने' या ओळीने सुरू होते.

डॉ. वि. रा. करंदीकरांनी लिहिलेली पाच कडवी व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'माझे मृत्युपत्र' कवितेतील शेवटचे कडवे मिळून ज्ञान प्रबोधिनीची सहा कडव्यांची प्रार्थना होते.



ज्ञान प्रबोधिनीच्या सदस्य मंडळच्या तिसऱ्या सभेच्या प्रारंभी दि. २२ ऑगस्ट १९६३ या दिवशी ही सहा कडवी सर्व प्रथम एक पद्य म्हणून गायली गेली. त्यानंतर ज्ञान प्रबोधिनीची प्रार्थना म्हणून या पद्याची योजना निश्चित करण्यात आली.

प्रार्थना समजून घेऊन म्हणण्यासाठी अर्थाची तोंडओळख म्हणून या पुस्तिकेचा निश्चित उपयोग होईल. प्रत्येकाचे चिंतन जेवढे सखोल व अनुभवपूर्ण होईल तितका अधिक सखोल अर्थ ज्याचा त्याला समजत जाईल. तसा प्रयत्न सर्वांनी सदैव चालू ठेवावा.

प्रार्थनेच्या शेवटच्या कडव्याचे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वतः इंग्रजी भाषांतर केले होते. त्यात 'इतिहास-निसर्ग-माने' चे भाषांतर 'Logic and History ह्न and Human Nature' असे केले आहे. 'बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे' चे भाषांतर 'We took up our Cross and deliberately followed Him' असे केले आहे. हे भाषांतर लक्षात घेऊनच त्या कडव्याचा भावार्थ लिहिला आहे.

गिरीश श्री. बापट
संचालक

सौर ज्येष्ठ १, शके १९३२
२२ मे २०१०

**राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची ।**
**ईर्षा निजांतरि धरूनि करावयाची ।।**

**ही हिंदुभू परमश्रेष्ठ पदास न्याया ।**
**आम्ही कृती नित करू झिजवोनि काया ।।१।।**



खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी
अशी तीव्र तळमळ मनात धरून
आम्ही एकत्र जमत आहोत.
हे परमात्मन्,
तू याचा साक्षी हो !

सर्व मांगल्यकारक परमेश्वरा !
आपल्या देशाला यशोशिखरावर नेण्यासाठी
आमच्या शरीराचा कण न् कण
आणि आमच्या आयुष्याचा
क्षण न् क्षण वापरला जाईल
असे होऊ दे !



**विज्ञान-ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो ।**
**अभ्यास देश-स्थितिचा समतोल चालो ।।**

**निष्ठा, विवेक प्रकटो, मन पूर्ण शुद्ध ।**
**वर्तू अम्ही दृढप्रसन्न नि ध्येयधुंद ।।२।।**



आमच्या दैनंदिन जीवनात
निसर्गशास्त्रे, समाजशास्त्रे आणि अध्यात्म या सर्वांचा
आम्ही उत्तम अभ्यास करू;
उत्तम वाचन करू, उत्तम चिंतन करू;
या अभ्यासाचा समाजाला उपयोग व्हावा म्हणून
आम्ही देशस्थितीचाही तितकाच उत्तम अभ्यास करू .

जेथे आम्ही पदार्पण करू,
तेथे निष्ठापूर्वक आणि विवेकाने
प्रत्येक प्रश्नाच्या मुळापर्यंत जाण्याचा
आम्ही प्रयत्न करू.
यासाठी मन नेहमी निर्मळ, संकल्पावर स्थिर व प्रसन्न ठेवू.
'रूप पालटू देशाचे' या ध्येयाशिवाय
अन्य कशासाठीही
आमची बुद्धी, शक्ती व कौशल्ये वापरण्याचे
आम्हाला सुचणारही नाही.

**होती अनेक हृदये जरि एकरूप ।**
**सामर्थ्य तेथ प्रकटेल तरी अमूप ।।**

**हा मंत्र संघरचनार्थ सदा जपू या ।**
**हे ज्ञान-कर्म-युत भक्ति-व्रत आचरू या ।।३।।**



कार्ये केवळ सदिच्छेने,
एकट्याने, वा केवळ संकल्प केल्याने,
सिद्धीस जात नाहीत.
त्यासाठी असे संकल्प केलेल्यांची संघटना करावी लागते.
यासाठीच श्री शिवछत्रपतींनी
महाराजा जयसिंगांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते,
''दोन हृदये जर एकत्र येतील
तर संकटांच्या पहाडांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील.''

मग अशा एकत्रित हृदयांची संघटना
आमच्या हातून घडो.
आमची मने संघटनेला आवश्यक अशी
लवचिक आणि जुळवून घेणारी,
परस्परांना प्रेमाने बांधणारी,
आणि कोणत्याही कारणासाठी
परस्परांपासून न तुटणारी अशी होवोत.
ज्ञानपूर्वक, संघटितपणे आणि भक्तियुक्त मनाने
देशकार्याच्या या व्रताचे आम्ही सदैव आचरण करू.



**की पुण्य-श्रेय-यश-कीर्ति सदैव लाभो ।**
**निंदा-प्रहार अथवा नच कोणि लोभो ।।**

**आशा हसो विमल वा भिववो निराशा ।।**
**सोडू कधी न पथ हा, चिर ठेवु आशा ।।४।।**



राष्ट्रसेवा, धर्मसेवा आणि ईश्वरसेवा या व्रतांचे
आमच्या व्यक्तिगत आणि सामूहिक आयुष्यात पालन करताना
कधी पुण्य केल्याचे समाधान,
कधी योग्य काम केल्याचा आनंद,
अनेकदा यशाचा अनुभव
आणि या यशामुळे कदाचित कीर्ती मिळेल.
प्रसंगी लोकनिंदेला आणि लोकक्षोभाला
सामोरे जावे लागेल.
किंवा उपेक्षा आणि दुर्लक्षही वाट्याला येईल.
परंतु या अनुभवांनी
आम्ही हुरळून जाणार नाही
किंवा हिरमुसले होणार नाही.

परिस्थिती आशादायक असो
किंवा निराशाजनक असो
आम्ही आमच्या ध्येयाच्या दिशेने
सतत पुढेच जात राहू .
आम्ही आज ना उद्या ध्येय गाठणारच आहोत
असा आमचा विजिगीषू आशावाद आहे.

**दाही दिशांत घुमुनी जयनाद जेव्हा ।**
**होई अखंड प्रिय भूमि अजिंक्य तेव्हा ।।**

आमच्या देशाचा सफल जीवनाचा आदर्श
साऱ्या जगाने स्वीकारावा;
आमचा देश पुन्हा अखंड व्हावा;
विद्या आणि शास्त्रे यात पारंगत व्हावा;
कर्तृत्वाने व पौरुषाने सर्व क्षेत्रांत
सर्व देशांना अजिंक्य व्हावा;

**हृन्मंदिरातिल निवेल तृषा कधीची ।**
**हे देव आस पुरवी तव पूजकांची ।। ५ ।।**

यासाठी, हे चैतन्यसागरा !
तुझे स्फुरण आमच्या देशात भरून राहिलेले असावे.
हीच अंतरीची तळमळ आहे.
आमचे हे संकल्प पूर्ततेला जातील,
अशी शक्ती तू आम्हाला दे.





**की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने ।**
**लब्ध-प्रकाश इतिहास-निसर्ग-माने ।।**

हे परमेश्वरा !
अभ्यासपूर्ण, संघटनायुक्त व कर्तृत्वसंपन्न जीवन
राष्ट्रहितार्थ कारणी लावण्याचे हे व्रत
आम्ही आंधळेपणाने स्वीकारलेले नाही.
राष्ट्राच्या गौरवाच्या आणि अपमानाच्या इतिहासाचा
आणि मनुष्य स्वभावाचा मागोवा घेत,
तर्कशुद्ध विचार करून,
आम्ही या कामासाठी
डोळसपणे कटिबद्ध झालो आहोत.

**जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे ।**
**बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ।।६ ।।**

इतरांना हे व्रत
लोकविलक्षण आणि कष्टदायक वाटले तरी
आम्ही ते समजून उमजून स्वीकारलेले असल्याने
शरीरात शेवटचा श्वास असेपर्यंत
आम्ही या व्रताशी एकनिष्ठ राहू.